महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर नामनिर्देशनाने केलेली नियुक्ती रद्द करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक कृबास-०१२४/प्र.क्र.१४३/२१स,**
मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक- ०४ फेब्रुवारी, २०२५.

वाचा- १. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३.
२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.कृपमं/प्रशासन संचालक नियुक्ती/१४३२/२०२४ दि.१८.०७.२०२४.
३. शासन निर्णय,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक कृबास-०१२४/प्र.क्र.१४३/२१स, दि.१९.०७.२०२४.
४. मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे दि.३०.०८.२०२४ रोजीचे आदेश.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ३९(ब) मध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर राज्यातील बाजार समित्यांच्या सभापती मधून प्रत्येक महसूल विभागातून एक सदस्य या प्रमाणे ६ सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्याअनुषंगाने अमरावती महसूली विभागातून कृषि उत्पन्न बाजार समिती, मलकापूर, जि.बुलढाणा या बाजार समितीचे सभापती श्री.शिवचंद्र तेजराव तायडे यांची महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर नामनिर्देशित सदस्य म्हणून संदर्भ क्र.३ येथील दि.१९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती.

२. श्री.शिवचंद्र तेजराव तायडे (तत्कालिन सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, मलकापूर) यांच्या विरुध्द मलकापूर बाजार समितीच्या दि.३१.०५.२०२४ रोजी पार पडलेल्या सभेत बहुमताने अविश्वास ठराव पारीत झाला होता. श्री.तायडे यांनी त्यांच्या विरुध्द पारित झालेल्या अविश्वास ठरावासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.३३५०/२०२४ दाखल केली होती. सदर रिट याचिका प्रकरणी मा.न्यायालयाने सदर अविश्वास ठराव वैध ठरवून दि.३०.०८.२०२४ रोजी अंतिम आदेश पारीत केले असून याचिका खारीज केली आहे.

३. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर संबंधित महसूली विभागातून नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३९ (ब) (७) नुसार सदरहू व्यक्ती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती असणे अनिवार्य

आहे. तथापि, श्री.तायडे हे सद्यस्थितीत मलकापूर बाजार समितीचे सभापती नसल्यामुळे, ते नियुक्तीसाठी पात्र ठरत नाहीत. त्यामुळे श्री.तायडे यांची संदर्भ क्र.३ येथील दि.१९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर अमरावती महसूली विभागातून नामनिर्देशित सदस्य म्हणून केलेली नियुक्ती या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०२०४११०७५११२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH DNYANDEO DESHMUKH

Digitally signed by SANTOSH DNYANDEO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=9652b1a97746d93924d97e059e2acb2aa9b6ef9c2644ab23e6c801f3e656b5ad, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=17757CD30ED5F82FA2A50F777CBE634900B7D3EBCB60660E708648C95D8488B7, cn=SANTOSH DNYANDEO DESHMUKH
Date: 2025.02.04 11:09:03 +05'30'

**( संतोष देशमुख )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मलकापूर, जि.बुलढाणा.
५. श्री.शिवचंद्र तेजराव तायडे, मु.पो.वरखेड, ता.मलकापूर, जि.बुलढाणा-४४३१०२.
६. निवडनस्ती (२१-स).